(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

सुप्रीम कोर्ट रिपोर्ट्स ६०५

उत्तर प्रदेश राज्य

विरुद्ध

एम. पी. सिंग व इतर

(सरन्यायाधीश . बी. पी. सिन्हा, न्या. पी. बी. गजेंद्रगडकर,

न्या. के. सुब्बा राव, न्या. के. सी. दास गुप्ता आणि न्या. जे. सी. शहा)

वाणिज्यिक आस्थापना – साखर कारखान्याचे शेतमजूर – वाणिज्यिक अस्थापनेतील कामगार असतेल तर – संयुक्त प्रांत दुकाने व वाणिज्यिक आस्थापाना अधिनियम १९४७ (१९४७ चा उत्तर प्रदेश कायदा नं. १२) चे कलम २(३), कारखाने अधिनियम १९४८ (१९४८ चा कायदा नं.५८) चे कलम २(१).

लक्ष्मीदेवी शुगर मिल्स लिमिटेडचे महाव्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक आणि सचिव या तिघांवर संयुक्त प्रांत दुकाने व वाणिज्यिक आस्थापाना अधिनियम १९४७ च्या कलम १२, १३ आणि २६ अन्वये कंपनीत वापरावयाच्या ऊसाची वाढ व पुरवठा यांचे मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रण यांसाठी नेमलेल्या शेत मजुरांच्या सुट्टी व रजा आणि काही रजिस्टरच्या देखभाली संदर्भातील कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. ते कर्मचारी कारखाना कायद्याच्या मर्यादेत कामगार असून त्यांना संयुक्त प्रांत दुकाने व वाणिज्यिक आस्थापाना अधिनियम लागू होत नाही, असा त्यांच्यावतीने प्रतिपादन करण्यात आले. न्यायदंडाधिकाऱ्यांनी ते प्रतिपादन फेटाळून लावत उत्तरवादींना कायद्याच्या कलम २६ अन्वये दोषी ठरवत प्रत्येकी ३० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. सत्र न्यायाधीशांनी निर्देशन पाठवून ही शिक्षा रद्द करण्याची शिफारस केल्याने उच्च न्यायालयाने उत्तरवादींची निर्दोष मुक्तता केली. राज्य सरकारने विशेष परवानगीने या न्यायालयात अपील केले आहे.

निर्णय दिला : उच्च न्यायालयाने दिलेला निर्दोष मुक्ततेचा आदेश चुकीचा होता.

कारखाने अधिनियमाच्या तरतुदी ह्या केवळ कारखान्यात काम करणारे कामगार यांच्या हिताकरिता असुन कारखान्यात वापरावयाच्या ऊसाची वाढ व पुरवठा यांचे मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रण यांसाठी नेमलेलले शेत मजुर हे कारखान्यात नेमेलेले नसल्याने त्यांना कारखाने अधिनियम लागू होत नाही व ते संयुक्त प्रांत दुकाने व वाणिज्यिक आस्थापाना अधिनियम १९४७ मधील ‘वाणिज्यिक अस्थापना’ या व्याख्येत येतात.

फौजदारी अपीलिय अधिकारिता : फौजदारी अपील नंबर १९५७ चे १५७ व १५८ आणि
१९५८ चे ५.

१९५४ च्या फौजदारी पुनरीक्षण क्रमांक ७, ८ व ९ मधील सत्र न्यायाधीश, देवरिया यांच्या १८ डिसेंबर १९५४ चा न्यायनिर्णय व आदेशामुळे निर्माण झालेल्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या ३१ ऑक्टोबर १९५५ च्या फौजदारी निर्देशन क्रमांक २८, २९ व ३० मध्ये झालेल्या न्यायनिर्णय व आदेशाविरुद्ध विशेष अनुमती घेऊन हे अपील केले आहे.

अपीलकर्त्यासाठी जी. सी. माथुर, सी. पी. लाल आणि जी. एन. दीक्षित,

उत्तरवादींसाठी डब्ल्यू. एस. बारलिंगे आणि ए. जी. रत्नपारखी

१५ डिसेंबर १९५९ रोजी न्यायनिर्णयदेणारे

न्या. शाह:- साखर कारखान्यात वापरासाठी ऊसाची वाढ व पुरवठा यांचे मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी साखर कारखान्याने नेमलेले पर्यवेक्षक व कामदार हे संयुक्त प्रांत दुकाने व वाणिज्यिक आस्थापाना अधिनिम (यापुढे तो कायदा म्हणून संबोधला जाईल) च्या कक्षेतील 'वाणिज्यिक अस्थापना' चे कर्मचारी आहेत का, असा प्रश्न या अपीलांच्या संचात ठरवायचा आहे. कायद्याच्या कलम २७ अन्वये उत्तरवादींवर खटला चालविणाऱ्या

दंडाधिकाऱ्यांनी असे मत दिले की, शेत मजुर हे वाणिज्यिक आस्थापनाचे कर्मचारी आहेत. अलाहाबाद येथील उच्च न्यायालयाने याच्या उलट मत मांडले. राज्यघटनेच्या अनुच्छेद १३६ अन्वये विशेष अनुमती सह उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात उत्तर प्रदेश राज्याने या न्यायालयात अपील केले आहे.

संयुक्त प्रांत दुकाने व वाणिज्यिक आस्थापाना अधिनिम १९४७ हा कायदा वाणिज्यिक आस्थापनांमधील रोजगाराचे तास आणि रोजगाराच्या इतर अटींचे नियमन करण्यासाठी पारित करण्यात आला होता. 'वाणिज्यिक अस्थापना' ची व्याख्या त्या कायद्याच्या कलम २(३) द्वारे केली आहे. त्या कायद्याच्या कलम १२ अन्वये कर्मचारी यांना कलम ११ नुसार देय सुट्ट्यांव्यतिरिक्त साप्ताहिक सुट्टी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कलम १३ मध्ये सामान्य, नैमित्तिक आणि "आजारपणाची रजा" देण्याची तरतूद आहे. कलम २६ नुसार नियोक्त्याने अशा नोंदीवही आणि अभिलेख ठेवणे आणि विहित केल्याप्रमाणे अशा नोटिसा प्रदर्शित करणे आवश्यक आहे. कलम २७ हे या कायद्याचे आणि त्याअंतर्गत बनविलेल्या नियमांचे उल्लंघनाबद्दलच्या दंडाबाबत आहे.

लक्ष्मी देवी शुगर मिल्स लिमिटेड (यापुढे कंपनी म्हणून ओळखले जाईल) चा छितौनी येथे साखर निर्मिती-कारखाना आहे. कंपनीचे मुख्य व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक आणि सचिव हे तिघेही उत्तर वादी आहेत. कंपनीत वापरावयाच्या ऊसाची वाढ व पुरवठा यांचे मार्गदर्शन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी कंपनीने काही विशिष्ट वर्गातील शेत मजुरांची नेमणूक केली. उत्तर प्रदेशाच्या दुकाने व वाणिज्यिक अस्थापना चे

उप मुख्य निरीक्षकाने न्यायदंडाधिकारी, देवरीया यांच्या कोर्टात या उत्तरवादींविरुद्ध त्यांनी कंपनीत वापरावयाच्या ऊसाची वाढ व पुरवठा यांचे मार्गदर्शन व पर्यवेक्षण आणि नियंत्रण करण्यासाठी नेमलेल्या विशिष्ट शेत मजुरांबाबत त्या कायद्याच्या कलम १२, १३ व २६ च्या उल्लंघानाचे आरोप ठेवले होते. उत्तरवादिंचे म्हणणे होते की ते कर्मचारी कारखाने अधिनियमांतर्गत कामगार असल्याने आणि त्यानुसार कायद्याच्या अंमलबजावणीतून सूट असल्याने हा कायदा त्या कर्मचाऱ्यांना लागू होत नाही. न्यायदंडाधिकाऱ्यांनी हा युक्तिवाद फेटाळून लावत उत्तरवादींना कायद्याच्या कलम २६ चे उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी ठरवले आणि तिन्ही प्रकरणांमध्ये प्रत्येकी ३० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. दोषसिद्धी आणि शिक्षेच्या आदेशाविरोधात उत्तरवादींनी देवरिया येथील सत्र न्यायालयात पुनरीक्षण अर्ज दाखल केला. सत्र न्यायाधीशांनी न्यायचौकशी दंडाधिकारी यांच्या मताशी असहमती दर्शवली आणि न्यायचौकशी दंडाधिकारी यांनी दिलेला दोषसिद्धी आणि शिक्षेचे आदेश रद्द करण्याची शिफारस करत ही प्रकरणे अलाहाबाद येथील उच्च न्यायालयाकडे पाठवली. उच्च न्यायालयाने हे निर्देशन स्वीकारले आणि उत्तरवादींची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले.

त्या कायद्याच्या कलम २ खंड ३ मधील वाणिज्यिक आस्थापनेच्या व्याख्येनुसार ज्या कारखान्यातील लिपिक व इतर आस्थापनेला कारखाने अधिनियम १९३४ मधील तरतुदी लागू होत नाहीत, त्यांचा समावेश या संज्ञेच्या अर्थात होतो. हे खरे आहे की, कारखान्यांच्या लिपिक व इतर आस्थापनांचा उल्लेख केली गेलेली व्याख्या ही १९३४ च्या

कारखाने अधिनियमासंदर्भात आहे परंतु १८९७ चा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १० च्या  कलम ८ च्या आधारे १९३४ चा कारखाना कायदा रद्द करून तो पुन्हा अंमलात आणणाऱ्या १९४८चा कारखाने अधिनियम ५३ मधील तरतुदींचा संदर्भ आहे असे समजला पाहिजे. सदर विशेष अनुमतीमध्ये राज्यातर्फे करण्यात आलेले प्रतिपादन; की कारखाने अधिनियम १९३४ रद्द झालेला असल्यामुळे कलम २ खंड ३ अंतर्गत वाणिज्यिक आस्थापनेच्या व्याख्येत कारखान्यातील सर्व लिपिक व इतर आस्थापनांचा कोणत्याही अपवादाशिवाय होतो, हे प्रतिपादन दुबळे आहे..

कारखाने अधिनियम १९४८  च्या कलम २(१) मध्ये कामगार याचा अर्थ दिलेला आहे की

‘‘प्रत्यक्ष किंवा कोणत्याही एजन्सीच्या माध्यमातून, मग ते मजुरीसाठी असो वा नसो, उत्पादन प्रक्रियेसाठी वापरल्या जाणा-या यंत्रे किंवा परिसराचा कोणताही भाग स्वच्छ करण्यासाठी किंवा उत्पादन प्रक्रियेशी अनुषंगिक किंवा तिच्याशी संबंधित असलेले किंवा उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी संबंधित असलेले इतर कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी योजलेली व्यक्ती’’.

आणि कारखान्याची व्याख्या कलम २ (एम) द्वारे केली आहे की ज्याचा अर्थ कारखान्याच्या परिसरासह कोणताही परिसर आहे ज्यामध्ये बारा महिन्यांच्या कोणत्याही दिवशी ठराविक संख्येने कामगार असतात नोकरी करत आहे. या व्याख्यांच्या एकत्रित अंमलाने कोणत्याही उत्पादन प्रक्रियेत किंवा उत्पादन प्रक्रियेशी संबंधित किंवा उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी संबंधित किंवा संबंधित इतर कोणत्याही प्रकारच्या कामासाठी वापरल्या जाणार-या

यंत्रांचा कोणताही भाग किंवा परिसराचा काही भाग स्वच्छ करण्यासाठी किंवा उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी संबंधित असलेल्या व्यक्तींना कारखान्यातील कामगार मानले जाते. कारखाने अधिनियमाच्या कलम २ (१) मधील 'इतर कोणत्याही प्रकारच्या कामात काम करणारे अनुषांगिक किंवा उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी निगडित' या अभिव्यक्तीचा वापर करून केवळ उत्पादन प्रक्रियेशी थेट जोडलेले कामगारच नव्हे, तर कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी निगडित असलेल्यांचा समावेश होतो. कारखाने अधिनियमातील कलम २ खंड (१) मधील 'उत्पादन प्रक्रियेचा विषय' या शब्दाचा नेमका अर्थ ठरविणे या प्रकरणाच्या हेतूने अनावश्यक आहे कारण कारखाने अधिनियमातील वैविध्यपूर्ण तरतुदी ह्या केवळ कारखान्यात, म्हणजे कारखान्याच्या भागात किंवा आवारात काम करणाऱ्या कामगारांना लाभ मिळवून देण्याच्या हेतूने आहेत. कारखान्यात वापरण्यात येणाऱ्या ऊसाच्या वाढीवर व पुरवठ्यावर मार्गदर्शन, देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यरत असलेले शेतमजूर एकतर कारखान्याच्या भागात किंवा कारखान्याच्या आवारात कार्यरत आहेत, असे मानणे चुकीचे आहे; आणि जर हे कामगार एखाद्या कारखान्यात कार्यरत नसतील तर कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतुदी त्यांना लागू होत नाहीत आणि ते स्पष्टपणे 'वाणिज्यिक आस्थापना' या व्याख्येत मोडतात.

पर्यवेक्षक व कामदार हे उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी म्हणजे ऊसासोबत जोडलेले असल्यामुळे ते कारखाने अधिनियमातील कामगार या व्याख्येत येत असुन त्यांना या कायद्याच्या ‘वाणिज्यिक आस्थापना’ या व्याख्येतून सुट असल्याचे उच्च न्यायालयाचे मत

होते. असे असले तरी पर्यवेक्षक व कामदार हे ‘उत्पादन प्रक्रियेच्या विषयाशी संबंधीत कोणत्याही प्रकारच्या कामात’ योजलेले असले तरी, ते जोपर्यंत कारखान्याच्या आत योजले जात नाही तोपर्यंत त्यांना कारखाने अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाहीत व या कायद्याच्या अर्थानुसार ते ' वाणिज्यिक आस्थापनेचे’ कर्मचारी आहेत यात कोणताही वाद नाही.

त्यामुळे ज्या गुन्ह्यांमध्ये त्यांना न्यायचौकशी दंडाधिकारी यांनी दोषी ठरवले होते, त्या गुन्ह्यांतून उत्तरवादींची निर्दोष मुक्तता करण्यात उच्च न्यायालयाची चूक झाली आहे. उच्च न्यायालयाने दिलेले दोषमुक्तीचे आदेश रद्द केले जातात आणि न्यायचौकशी दंडाधिकारी यांनी दिलेले दोषसिद्धी आणि शिक्षेचे आदेश पूर्ववत केले जातात. विशेष अनुमती देताना १ ऑक्टोबर १९५६ रोजी या न्यायालयाने दिलेला आदेश लक्षात घेता उत्तरवादी हे या न्यायालयात सुनावणीचा खर्च मिळण्यास पात्र आहेत.

अपील मंजूर

--x—x—x—x—x—x—x—x—

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x